## निवडक

### साळ मधील करयेश्वर देवस्थानमध्ये आज सत्यनारायण महापूजा

■ टीम दैनिक हेराल्ड




**साळ, दि. २५** : साळ येथील श्री महादेव भूमिका पंचायतन देवस्थान क्षेत्रात येणाऱ्या व साळ गडेत्सवात महत्त्वाचे स्थान असलेले श्री करयेश्वर देवाच्या स्थळी वार्षिक श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सत्यनारायण पूजा रविवार दि. २६ रोजी दुपारी होईल.
सदर महापूजा पुरोहित यशवंत गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. वैष्णवी (प्रतिमा ) व श्री. वासुदेव (बापू) शिवा परब या दांपत्याच्या यजमानाखाली होईल. पुराण वाचन, आरती, तीर्थ प्रसाद व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी साळ, वडावल व पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून लाभ घ्यावा, श्री महादेव भूमिका देवस्थान समिती व साळ ग्रामस्थांच्या वतीने अध्यक्ष कालिदास राऊत व सचिव विशाल परब यांनी प्रसिद्ध केले आहे.

---

### साखळी सरकारी महाविद्यालयात उद्यापासून अनुवाद कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २५** : भूमी क्रिएशन साखळी कोंकणी अकादमी पणजी आणि कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय सांखळी यांच्या सयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'अनुवाद कार्यशाळा' आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सोमवार दि.२७ व मंगळवार दि.२८ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ४.३० या वेळेत कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय सांखळी येथे होणार आहे. या कार्यशाळेच्या उद्‌घाटन सोहळ्यास गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत अध्यक्षीयस्थान भूषवतील तर सांखळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. नामदेव गांवस हे सन्माननीय अथिती म्हणून उपस्थित रहाणार आहेत.
या कार्यशाळेत स्नेहा सबनीस, डॉ.सोनिया शिरसाट, प्रा. उर्वशी नायक, चेतन आचार्य व झिलू गांवकर हे अनुक्रमे 'प्रशासकीय अनुवाद', साहित्यिक अनुवादः सिध्दांत आणि व्यवहार, समाज माध्यमे आणि अनुवादाच्या संधी, डिजिटल माध्यमः अनुवादाचे आधुनिक तंत्र आणि अनुवादन कलेत अनुवादकाची भुमिका या विषयी मार्गदर्शन करणार आहेत. असे भूमी क्रिएशनचे अध्यक्ष झिलू गांवकर यांनी कळविले आहे.

---

### वनमावळिंगे क्रीडा मैदानाच्या विविध सुविधांचा आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५** : वनमावलींगे कुडचिरे येथील क्रीडा मैदानाच्या संरक्षक भिंत स्टेज ड्रेसिंग रूम व इतर सुविधांच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्या हस्ते आज २६ जानेवारी रोजी सायंकाळी चार वाजता मावलिंगे क्रीडा मैदान परिसरात होणार आहे .
यावेळी पंचायत मंत्री माविन गुदिन्हो, मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट, जिल्हा अध्यक्ष शंकर चोडणकर,महेश सावंत, सरपंच दिया गावकर, उपसरपंच अंजली च्यारी, वासुदेव राऊत, पंचायत सदस्य व इतर मान्यवर उपस्थित असतील. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार शेट यांनी केलें आहे.

---

### ज्येष्ठ नागरिक केंद्रात आज प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५** : सोनार पेठ डिचोली येथील बाबा सावईकर सेवा प्रतिष्ठान संचालित सेकंड इनिंग्ज ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्रातर्फे रविवार दि. २६ रोजी सायंकाळी ४.४५ वाजता प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम सोनार पेठ डिचोली येथील प्रायड बँक्वेट्स्, पाचवा मजला, बडोदा बँक तथा एलआयसी कार्यालयाच्या वर कार्यरत असलेल्या जेष्ठ नागरिक सेवा केंद्राच्या सभागृहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे तथा वक्ते म्हणून माजी केंद्रीय कायदा मंत्री तथा गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री अॅड. रमाकांत खलप उपस्थित राहणार आहेत. सन्माननीय अतिथी म्हणून डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेटये, डिचोलीचे नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, डिचोली लायन्स क्लबचे रोहित जिरगे आदी मंडळी उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांनी आणि इतर मंडळींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन बाबा सावईकर सेवा प्रतिष्ठानचे विश्वस्त रमाकांत शेट्ये तथा ज्येष्ठ नागरिक केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# पहाटेच्या अंधारात 'ती' करीत राहिली मदतीची याचना

## बलात्कार करून पाच नराधमांनी पिडीतेला सोडून दिले रस्त्यावर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५** : मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या युवतीवर अमानुषपणे सामूहिक बलात्कार केल्यानंतर देखील आरोपींनी या युवतीसोबत अत्यंत क्रूर वर्तन केल्याचे पोलिस चौकशीतून पुढे आले आहे. यामुळे पोलीसच नव्हे तर सामान्य जनताही अत्यंत संताप व्यक्त करीत आहे.

कासावलीमध्ये अत्यंत अमानुषपणे मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या युवतीवर सामूहिक बलात्कार झाल्यानंतर तिला पहाटे ३.३० वाजता या पाचही नराधमांनी रस्त्याच्या कडेला सोडून देऊन पळ काढला. त्यानंतर ही असहाय्य तरुणी पहाटेच्या अंधारात नुवे महामार्गावर मदतीची याचना करू लागली. पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार पीडितेने जाणाऱ्या वाहनांना थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु एकही वाहन तिच्यासाठी थांबले नाही . बऱ्याच कालावधीनंतर एका वाहनचालकाला तिची दया आली आणि त्याने तिला धीर देत पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला आणि अधिकारी येईपर्यंत तो पीडितेसोबत राहिला. तिला धीर देत राहिला, अशी माहिती दक्षिण गोव्याच्या पोलीस अधीक्षक सुनीता सावंत यांनी दिली.



पीडितेसोबत घडलेला प्रकार समजताच पोलिस पथकांनी मोबाईल टॉवर डेटा, फिंगरप्रिंट्स आणि फॉरेन्सिक पुराव्यांचा वापर करून जलदगतीने कारवाई केली. आदिल अल्गुर (१८) रा. चिखली, मोहम्मद मुल्ला (२२) रा. मंगोर हिल–वास्को, शहजाद शेख (१८) रा. खारीवाडा–वास्को, विरेश अगुंडा (१८) रा. वास्को आणि मोहम्मद यासिर शेख (१८) रा. बोगदा–वास्को यांना अटक केली. पोलिसांनी ज्या फ्लॅटमध्ये गुन्हा घडला तो फ्लॅट शोधून काढला, पीडितेला घेऊन जाण्यासाठी वापरलेले वाहन आणि पुरावा म्हणून पाच मोबाईल फोन जप्त केले. प्राथमिक तपासात असे दिसून आले की मुल्लाचे वाहन गुन्ह्याचे केंद्रस्थानी होते, तर विरेश आणि यासिर यांना व्हॉट्सअॅपद्वारे गेस्टहाऊसचे स्थान तपशील पाठवण्यात आले होते.

कासावली मधील गेस्टहाऊसबद्दल अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. या गेस्टहाऊसयामध्ये येणाऱ्या जणाऱ्यांची नोंद ठेवण्यात आलेली नसल्याचे आढळले . तसेच येणाऱ्यांकडून कोणतेही ओळखपत्र घेण्यात येत नसल्याचेही आढळून आले.योग्य नोंदीशिवाय खोली कशी भाड्याने देण्यात आली हे निश्चित करण्यासाठी कर्मचाऱ्यांची चौकशी केली जात आहे, असे एका पोलिस सूत्राने सांगितले. पर्यटन विभागाने गेस्टहाऊसचा ट्रेड लायसन्स रद्द करण्याची आणि गुन्ह्यात वापरल्या जाणाऱ्या वाहनाचा रेंट–अ–कॅब परवाना रद्द करण्याची शिफारस कायदा अंमलबजावणी विभागाने केली आहे.

पीडितेने तिच्या आईला तिचा क्लेशकारक अनुभव सांगितलयानंतर आईने फातोर्डा पोलिसांकडे पोलिस तक्रार दाखल केली. बीएनएस कायदा, २०२३ च्या कलम १३८, ७०(१) आणि ६४(१)(के)(एम) अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला. पाचही आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

केवळ गुन्हेगारांसाठीच नव्हे तर सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन न करणाऱ्या आस्थापनांसाठीही जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी अधिकारी प्रयत्न तीव्र करत आहेत. या प्रकरणामुळे गेस्टहाऊसच्या नियमांबद्दल आणि राज्यात महिलांच्या सुरक्षिततेबद्दल पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.



## पॅराग्लायडिंगला पुढील आदेशापर्यंत बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५** : गेल्या आठवड्यात केरी येथे पॅराग्लायडिंग करताना पुण्यातील पर्यटक आणि एका पॅराग्लायडर पायलटचा मृत्यू झाल्यानंतर, सरकारने पुढील आदेशापर्यंत संपूर्ण गोव्यात पॅराग्लायडिंग स्पोर्ट्स (मोटाराइज्ड आणि नॉन–मोटाराइज्ड) स्थगित केले आहेत.पर्यटन संचालक केदार नाईक यांनी या संदर्भात एक आदेश जारी केला आहे.

विभागाने म्हटले आहे की, गोवा पर्यटन व्यापार नोंदणी कायदा, १९८२ अंतर्गत राज्यभरातील पॅराग्लायडिंग क्रियाकलापांशी संबंधित सर्व विद्यमान नोंदणींचा आढावा घेतला जाईल, जेणेकरून आवश्यक सुरक्षा मानकांचे पालन केले जाईल.

विभागाने पॅराग्लायडिंग क्रियाकलापांमध्ये गुंतलेल्या, मोटाराइज्ड आणि नॉन–मोटाराइज्ड सर्व ऑपरेटर्सना तपासणीसाठी विभागाकडे विहित कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.गेल्या आठवड्यात, महाराष्ट्रातील एक महिला पर्यटक, शिवानी दाबले आणि नेपाळमधील पॅराग्लायडर पायलट, सुमन नेपाळी यांचा केरी पठारावर उड्डाणादरम्यान दोरी तुटल्याने मृत्यू झाला. गोवा पोलिसांनी पॅराग्लायडिंग कंपनीच्या मालकावर सदोष हत्येचा आरोप लावला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानगी न घेता हाइक 'एन' फ्लायचे मालक शेखर रायजादा यांनी उपक्रम सुरू ठेवल्याबद्दल पोलिसांनी त्यांना अटक केली.पर्यटन विभागाने स्पष्ट केले होते की त्यांनी केरी पठारावर पॅराग्लायडिंगसाठी कोणतीही परवानगी किंवा मान्यता दिली नव्हती.

## आश्वे– मांद्रेत अपघात ; तीन विदेशी पर्यटक गंभीर जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड



पेडणे, दि. २५ : आश्वे–मांद्रे आजोबा जवळ मुख्य रस्त्यावर जीए ०३ एएन ८०५४ व जीए ०३ एएक्स १४९२ या दोन वाहनांमध्ये अपघात होऊन तिघे पर्यटक गंभीरित्या जखमी होण्याची घटना घडली. या तिघांनाही जिल्हा हॉस्पिटल म्हापसा येथे उपचारासाठी पाठवण्यात आले.

२५ रोजी रात्री आठच्या दरम्यान जीए ०३ एएन ८०५४ ही मोटरसायकल मांद्रे ते मोरजी येत होती. तर त्या विरोधात जीए एएक्स १४९२ ही वाहन जात असताना समोरासमोर दोन वाहनांमध्ये अपघात होऊन तीन पर्यटक गंभीरित्या जखमी होण्याची घटना घडली. त्यामध्ये दोन पुरुष आणि एक महिलेचा समावेश आहे. तिघांनाही जिल्हा हॉस्पिटल म्हापसा येथे उपचारासाठी पाठवण्यात आले. ही घटना रात्री ८ दरम्यान घडल्यानंतर एक तास आपत्कालीन वाहन १०८ वाहन वेळेवर पोचले नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अपघातात जखमी झालेल्यांची नावे अजून मिळालेली नाहीत. या संदर्भात मांद्रे पोलिसांनी घटनेचा पंचनामा केलेला आहे. हवालदार आत्माराम गवंडी पुढील तपास करीत आहेत.

# युवा शक्ती देशाचे भविष्य घडवण्यासाठी सक्षम

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : डिचोलीत युवा महोत्सवाचे उद्‌घाटन : दोन दिवस भरगच्च कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५** : युवाशक्ती ही देशाची प्रेरणास्थान असून त्यांनी साहित्य शिक्षण संस्कृती जतन करीत युवा महोत्सवाच्या माध्यमातून योगदान प्रतिभेला उत्तेजन द्यावे, हा महोत्सवाचा हेतू आहे. मुख्यमंत्री या नात्याने यापूर्वी कोकणीसाठी कोणीच केले नाही एवढे कार्य आपण केलेले आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

सर्वण–डिचोली येथे उत्साहात प्रारंभ झाला. कोकणीच भाषा मंडळाला उत्तम दर्जाचे कार्यालय व इतर सुविधा दिल्या. आज या युवा कोकणी महोत्सवात मला ऐनवेळी निमंत्रण देऊनही कोणत्याही प्रकारचा इगो न बाळगता कोकणीच्या सेवेसाठीच आपण या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी डिचोली येथे आयोजित २६व्या युवा महोत्सवाच्या उद्‌घाटप्रसंगी केले.

आपल्या भाषणात अप्रत्यक्ष नाराजीचा सूर व्यक्त करताना मुख्यमंत्र्यांनी आयोजकांनी योग्य पद्धतीने या युवा महोत्सवाला मुख्यमंत्र्यांना आमंत्रित केले नाही, हे त्यांना निश्चितपणे मनाला लागल्याचे त्यांच्या भाषणातून जाणवले. कोकणी भाषा मंडळ गोवा आयोजित २६वा गोवा युवा महोत्सवाचे आयोजन नारायण झांट्ये वाणिज्य महाविद्यालयच्या पटांगणावर करण्यात आले आहे.



**डिचोली : युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, आमदार प्रेमेंद्र शेट, स्वागतध्यक्ष डॉ. चंद्रकांत शेट्ये, प्राचार्य राजेंद्र कुंभार जुवेकर, रत्नमाला दिवकर, रुपेश ठाणेकर, गजानन बांबोळकर व इतर.**

कोकणी भाषा मंडळ, युवा जैतिवंत दिवचल आणि नारायण झांट्ये वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्यदिव्य युवा सोहळा होत आहे. त्याचे उद्‌घाटन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कल्पवृक्ष रोपट्याला पाणी घालून केले. यावेळी व्यासपीठावर समितीचे स्वागत अध्यक्ष डॉ. चंद्रकांत शेटये, अतिथी आमदार प्रेमेंद्र शेट, कोकणी भाषा मंडळाच्या अध्यक्षा रत्नमाला दिवकर, उपाध्यक्ष रुपेश ठाणेकर, प्राचार्य राजेंद्र कुंभार जुवेकर, आनंद बंबोलकर तन्वी पळ, मानसी पावसकर आदि उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते नंदन कुंकळकर यांना युवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. ओमकार च्यारी यांनी स्वागत गीत सादर केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या नायर, ब्रिजेश शेट्ये यांनी केले. दोन दिवस चालणाऱ्या या युवा महोत्सवात शैक्षणिक संस्था व विविध गटांसाठी भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

कोकणी पॉप, लोकमांड परंपरिक लोकनृत्य, देशी परंपरिक वेष, प्रश्नमंजुषा स्पर्धा, भित्तीपत्रक, (फासकी) रंगीत खोमीज डिजिटल आर्ट, गोव्याच्या पारंपारिक वाद्यांची जुगलबंदी लोकनाट्य, स्ट्रीट प्ले, ट्रियो आदी विविध स्पर्धा होणार आहेत. महोत्सवात युवा शक्तिची मोठी उपस्थिती लाभली आहे. युवा महोत्सवात गोव्याच्या संस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवणारी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# महिलांच्या सुरक्षेबाबत सरकार गंभीर नसल्याचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५** : पिंक फोर्स आणि दोन विशेष महिला पोलिस स्टेशनची राज्यात स्थापना असूनही, महिलांची सुरक्षा ही एक गंभीर चिंता झाली आहे. महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने या उपक्रमांच्या प्रभावीतेबद्दल आणि महिलांची सुरक्षा खरोखरच सरकारसाठी प्राधान्य आहे का? याबद्दल प्रश्न उपस्थित झाले आहेत. या विषयाबद्दलच्या जनतेच्या भावना समजून घेण्यासाठी हेराल्ड मीडियाने सामाजिक क्षेत्रातल्या काही महिलांशी संवाद साधला.

याबाबत 'बायलांचो एकवोट' संघटनेच्या संयोजक आवदा व्हिएगस यांनी सक्रिय उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित केली. त्या म्हणाल्या, दक्षिण गोवा पोलिस गुन्ह्यानंतर गुन्हेगारांना पकडण्यासाठी तत्पर असले तरी, प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अभाव आहे. बसस्थानकांवर, विशेषतः रात्रीच्या वेळी, पोलिसांची उपस्थिती महत्त्वाची आहे. कोणीही असुरक्षित महिलांचा गैरफायदा घेऊ नये याची खात्री करण्यासाठी बीट पोलिसांनी पोलिस ठाण्याचे डोळे आणि हात म्हणून काम केले पाहिजे. गुन्ह्यांना रोखण्यासाठी पिंक फोर्स आणि स्थानिक पोलिस कॉन्स्टेबलची नियमित गस्त आवश्यक आहे.व्हिएगास यांनी गुन्हेगारी कारवायांसाठी, विशेषतः तरुण गुन्हेगारांकडून गैरवापर केलेल्या मालमत्ता सील करण्याचे महत्त्व देखील अधोरेखित केले.



सामाजिक कार्यकर्त्या तारा केरकर यांनी पिंक फोर्सच्या कारवायांवर नाराजी व्यक्त केली. महिला पोलिस स्टेशनमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे आणि अनेक महिला पोलिस अधिकारी कामावर नसल्यासारखे वाटतात. त्या सरकारी पगार मिळवण्यात समाधानी दिसतात आणि सक्रिय फील्डवर्क टाळतात, असा आरोप त्यांनी केला.

केरकर यांनी पिंक फोर्सच्या दृश्यमानतेच्या अभावावरही टीका केली, त्यांनी त्यांची वाहने रात्रभर पणजी चर्चजवळ, जसे की रिकामी पार्क केली जात असल्याचे उदाहरणे दिली. शहर आणि गावांमध्ये गस्त घालण्याचा मूळ हेतू पूर्ण होत नाही. वाढत्या गुन्हेगारीला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी अधिक पिंक फोर्स वाहनांची आवश्यकता आहे, असे त्या पुढे म्हणाल्या.

ट्रेड युनियन नेत्या स्वाती केरकर यांनी गोव्यात महिलांच्या सुरक्षेच्या एकूण स्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. सुरक्षा उपाययोजना असूनही, महिला असुरक्षित राहतात. यावरून सरकारी यंत्रणा अप्रभावी असल्याचे दिसून येते. गुन्हेगारांना शिक्षा होत नाही, अनेकदा त्यांना जामीन मिळतो किंवा पुन्हा गुन्हा करण्यापूर्वी कमीत कमी तुरुंगवास भोगावा लागतो. कायद्याची भीती आता राहिलेली नाही, असे त्यांनी नमूद केले.

या समस्या सोडवण्यात सरकारला गांभीर्याने घेतले जात नसल्याबद्दल केरकर यांनी टीका केली. संघटना त्यांचे आवाज उठवत आहेत, परंतु सरकार अजूनही कान बंद करत आहे, असे त्यांनी निष्कर्ष काढले.

गोव्यात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. १ जानेवारी २०२४ ते २५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यात सात महिलांची हत्या झाली, तर बलात्काराचे ४७ आणि विनयभंगाचे ५२ गुन्हे दाखल झाले. महिलांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सरकारने त्यांच्या धोरणांचा पुनर्विचार करण्याची तातडीची गरज जनतेच्या आक्रोशातून अधोरेखित होते. वाढीव गस्त, वाढीव जबाबदारी आणि कायद्यांची कठोर अंमलबजावणी हे काही उपाय आहेत जे व्यवस्थेवरील विश्वास पुनर्संचयित करण्यास आणि संपूर्ण गोव्यात महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यास मदत करू शकतात.

